असा. क्र. ५ रजिस्टर्ड नं. एमएच/एमआर/साऊथ-२२९/२००६-०८

# महाराष्ट्र शासन राजपत्र

**असाधारण**

**प्राधिकृत प्रकाशन**

**मंगळवार, फेब्रुवारी २७, २००७ / फाल्गुन ८, शके १९२८**

**स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.**

## भाग चार

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | पृष्ठे |
|---|---|
| **सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**––मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश . . . . . . . . | **९३-९९** |

## नगरविकास विभाग

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २७ फेब्रुवारी २००७.

**MAHARASHTRA ORDINANCE No. II OF 2007.**

AN ORDINANCE FURTHER TO AMEND THE MUMBAI MUNICIPAL CORPORATION ACT, THE BOMBAY PROVINCIAL MUNICIPAL CORPORATIONS ACT, 1949 AND THE CITY OF NAGPUR CORPORATION ACT, 1948.

**सन २००७ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक २.**

**मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी अध्यादेश.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही ;

१८८८ चा मुंबई ३. १९४९ चा मुंबई ५९. १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८, यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे ;



[**किंमत :** रुपये ९.००]

**त्याअर्थी, आता,** भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद २१३ च्या खंड (१) द्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून, महाराष्ट्राचे राज्यपाल, याद्वारे, पुढील अध्यादेश प्रख्यापित करीत आहेत :—

## प्रकरण एक

## प्रारंभिक

संक्षिप्त नाव व प्रारंभ.

**१.** (१) या अध्यादेशास, महाराष्ट्र महानगरपालिका (सुधारणा) अध्यादेश, २००७ असे म्हणावे.

(२) तो तात्काळ अंमलात येईल.

## प्रकरण दोन

## मुंबई महानगरपालिका अधिनियमामध्ये सुधारणा.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ४५ ची सुधारणा.

**२.** मुंबई महानगरपालिका अधिनियम (यात यापुढे ज्याचा निर्देश " मुंबई महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ४५ मध्ये, खंड (क) मधील, परंतुकामध्ये,— १८८८ चा मुंबई ३.

(एक) " पुन्हा निवडून आलेल्या " या मजकुराऐवजी, " पुन्हा नियुक्त केलेल्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " फेरनिवडणुकीच्या " या मजकुराऐवजी, " पुनर्नियुक्तीच्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५० ची सुधारणा.

**३.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५० मध्ये, पोट-कलम (४) मधील, खंड (क) च्या परंतुकामध्ये,—

(एक) " पुन्हा निवडून आलेल्या " या मजकुराऐवजी, " पुन्हा नियुक्त केलेल्या " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(दोन) " पुन्हा निवडून आला असेल " या मजकुराऐवजी, " पुन्हा नियुक्त झाला असेल " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५०ल ची सुधारणा.

**४.** मुंबई महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ५०ल मध्ये, पोट-कलम (२) मधील, " फेरनिवडणुकीस " या मजकुराऐवजी, " पुनर्नियुक्तीस " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १८८८ चा मुंबई अधिनियम क्रमांक ३ याच्या कलम ५०स ची सुधारणा.

**५.** मुंबई महानगरपालिका अधिनियमातील कलम ५०स ला त्याचे पोट-कलम (१) असा नवीन क्रमांक देण्यात येईल ; आणि

(क) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) मध्ये, " महानगरपालिका एकल संक्रमणीय मताद्वारे " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " महानगरपालिकेला नियम करता येतील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" पोट-कलम (२) च्या तरतुदींअनुसार महानगरपालिकेकडून पालिका सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे करण्यात येईल " ;

(ख) अशा प्रकारे नवीन क्रमांक देण्यात आलेल्या पोट-कलम (१) नंतर, पुढील पोट-कलमे जादा दाखल करण्यात येतील :—

" (२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून, शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामुळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास महानगरपालिकेला प्रतिबंध होतो, असा अर्थ लावला जाणार नाही :

१९८७ चा महा. २०. परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा अशा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल. " .

## प्रकरण तीन

### मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ यामध्ये सुधारणा.

१९४९ चा मुंबई ५९. **६.** मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ याच्या कलम ३१ नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :— सन १९४९ चा मुंबई अधिनियम क्रमांक ५९ यामध्ये कलम ३१अ समाविष्ट करणे.

प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन समित्यांवर नाम-निर्देशनाद्वारे नियुक्ती करणे.

**" ३१अ.** (१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्याची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्याव्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात अथवा तदन्वये केलेल्या नियमांत किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेद्वारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींअनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करून करण्यात येईल—मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तिक रिक्त पदावरील असो :—

(क) स्थायी समिती ;

(ख) परिवहन समिती ;

(ग) कलम ३० अन्वये नियुक्त केलेली कोणतीही विशेष समिती ;

(घ) कलम ३१ अन्वये नियुक्त केलेली कोणतीही तदर्थ समिती.

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामुळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास महानगरपालिकेला प्रतिबंध होतो, असा अर्थ लावला जाणार नाही :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षांचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील. १९८७ चा महा. २०.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्‌भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल.".

## प्रकरण चार

## नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यामध्ये सुधारणा.

१९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड २.

**७.** नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ (यात यापुढे ज्याचा निर्देश " नागपूर महानगरपालिका अधिनियम " असा करण्यात आला आहे) याच्या कलम ३४ मध्ये,— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३४ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (१) मध्ये, " निवड करील " या मजकुराऐवजी, " नियुक्ती करील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (२) मध्ये, " पुन्हा निवडून येण्यास " या मजकुराऐवजी, " पुन्हा नियुक्त होण्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) समासटीपेमध्ये, " निवडणूक " या मजकुराऐवजी, " नियुक्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**८.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३६ मध्ये, " पुन्हा निवडून येण्यास " या मजकुराऐवजी, " पुन्हा नियुक्त होण्यास " हा मजकूर दाखल करण्यात येईल. सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३६ ची सुधारणा.

**९.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३७ मध्ये,— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३७ ची सुधारणा.

(१) " निवडून देईल " या मजकुराऐवजी, " नियुक्त करील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) " निवडून आलेला " या मजकुराऐवजी, " नियुक्त केलेला " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**१०.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ३९ मध्ये,— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ३९ ची सुधारणा.

(१) पोट-कलम (३) मध्ये, " निवड करील " या मजकुराऐवजी, " नियुक्ती करील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(२) पोट-कलम (४) मध्ये, " निवड करील " या मजकुराऐवजी, " नियुक्ती करील " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(३) समासटीपेमध्ये, " निवडणूक " या मजकुराऐवजी, " नियुक्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

**११.** नागपूर महानगरपालिका अधिनियमाच्या कलम ४० मध्ये,— सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ याच्या कलम ४० ची सुधारणा.

(१) " महानगरपालिकेला " या मजकुराने सुरू होणाऱ्या आणि " नेमता येतील " या मजकुराने संपणाऱ्या मजकुराऐवजी, पुढील मजकूर दाखल करण्यात येईल :—

" महानगरपालिकेला, वेळोवेळी आणि तिला योग्य वाटेल त्या कालावधीसाठी, महिला व बालकल्याण समितीसह विशेष समित्या देखील, अशा समित्यांची संख्या पाचपेक्षा अधिक होणार नाही अशा प्रकारे, नियुक्त करता येतील ";

(२) समासटीपेमध्ये, " निवडणूक " या मजकुराऐवजी, " नियुक्ती " हा मजकूर दाखल करण्यात येईल.

सन १९५० चा मध्य प्रांत व वऱ्हाड अधिनियम क्रमांक २ मध्ये कलम ४०अ समाविष्ट करणे.

**१२.** नागपूर महानगरपालिका अधिनियमात, कलम ४० नंतर, पुढील कलम समाविष्ट करण्यात येईल :—

प्रमाणशीर प्रतिनिधित्व देऊन समित्यांवर नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती करणे.

" **४०अ.** (१) कोणत्याही समितीवरील पालिका सदस्यांची नियुक्ती ही त्याने धारण केलेल्या कोणत्याही पदाच्या आधारे असेल अशी ज्याबाबतीत या अधिनियमाद्वारे तरतूद करण्यात आली असेल त्या व्यतिरिक्त एरव्ही, पुढील समित्यांच्या बाबतीत या अधिनियमात किंवा तदन्वये केलेल्या नियमांत किंवा उपविधींमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, महानगरपालिकेद्वारे या समित्यांवर केली जाणारी पालिका सदस्यांची नियुक्ती ही, पोट-कलम (२) च्या तरतुदींअनुसार पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करून करण्यात येईल— मग ही नियुक्ती नियमित पदावरील असो किंवा नैमित्तिक रिक्त पदावरील असो :—

(क) स्थायी समिती ;

(ख) कलमे ३९ व ४० यांअन्वये नियुक्त केलेल्या विशेष संमंत्रक समित्या.

(२) समितीवर पालिका सदस्यांचे नामनिर्देशन करताना, महानगरपालिका, मान्यताप्राप्त पक्षांचे अथवा नोंदणीकृत पक्षांचे किंवा गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेईल आणि सभागृह नेता, विरोधी पक्षनेता व अशा प्रत्येक पक्षाचा किंवा गटाचा नेता यांच्याशी विचारविनिमय करून, शक्यतोवर, महानगरपालिकेतील अशा पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात सदस्यांचे नामनिर्देशन करील :

परंतु, या पोट-कलमात अंतर्भूत असलेल्या कोणत्याही गोष्टीचा, तिच्यामुळे अशा कोणत्याही पक्षाच्या किंवा गटाच्या नसणाऱ्या कोणत्याही सदस्याचे समितीवर नामनिर्देशन करण्यास महानगरपालिकेला प्रतिबंध होतो, असा अर्थ लावला जाणार नाही :

परंतु, आणखी असे की, महाराष्ट्र स्थानिक प्राधिकरण सदस्य अनर्हता अधिनियम, १९८६ यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, या अधिनियमान्वये मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट यांचे तौलनिक संख्याबळ निश्चित करण्याच्या प्रयोजनाकरिता, निवडणूक निकालांच्या अधिसूचनेच्या दिनांकापासून एक महिन्याच्या कालावधीच्या आत, मान्यताप्राप्त पक्ष किंवा नोंदणीकृत पक्ष वा गट अथवा कोणत्याही पक्षाचे किंवा गटाचे नसलेले निर्वाचित पालिका सदस्य यांना एकत्र येऊन आघाडी किंवा फ्रंट तयार करता येईल आणि अशा आघाडीची किंवा फ्रंटची नोंदणी झाल्यावर, अशा आघाडीच्या किंवा फ्रंटच्या सदस्यांना, उक्त अधिनियमाच्या तरतुदी, जणू काही ही आघाडी किंवा फ्रंट निवडणुकीपूर्वीच नोंदणीकृत असल्याप्रमाणे, लागू होतील. १९८७ चा महा. २०.

(३) अशा पक्षाच्या किंवा गटाच्या वतीने नामनिर्देशित करावयाच्या पालिका सदस्यांच्या संख्येच्या बाबतीत कोणताही प्रश्न उद्भवल्यास, त्याबाबतीत, महानगरपालिकेचा निर्णय अंतिम असेल. ".

## निवेदन.

मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ व नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये स्थायी समिती व विषय समित्या घटित करण्यासाठी तरतूद आहे. महानगरपालिकेकडून निवडणुकीद्वारे या समितीच्या सदस्यांची नियुक्ती करण्यात येते.

२. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांमधील मान्यताप्राप्त पक्षांचे व गटांचे तौलनिक संख्याबळ विचारात घेऊन अशा मान्यताप्राप्त पक्षांच्या व गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात महाराष्ट्र विधानमंडळाच्या विविध समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्यात येते. यामुळे राज्य विधानमंडळामधील सर्व मान्यताप्राप्त पक्षांना व गटांना खात्रीपूर्वक पुरेसे प्रतिनिधित्व मिळते.

३. महानगरपालिकेमधील सर्व मान्यताप्राप्त पक्षांना व गटांना महानगरपालिका अधिनियमांन्वये घटित करण्यात येणाऱ्या समित्यांमध्ये खात्रीपूर्वक पुरेसे प्रतिनिधित्व मिळावे म्हणून, महानगरपालिकेमधील राजकीय पक्षांच्या किंवा गटांच्या संख्याबळाच्या प्रमाणात समित्यांवर सदस्यांचे नामनिर्देशन करण्याकरिता तरतूद करण्यासाठी या अधिनियमांमध्ये सुधारणा करणे इष्ट आहे असे शासनास वाटते.

४. राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नाही आणि उपरोक्त प्रयोजनांसाठी, महाराष्ट्राच्या राज्यपालांनी, मुंबई महानगरपालिका अधिनियम, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम, १९४९ आणि नागपूर शहर महानगरपालिका अधिनियम, १९४८ यांमध्ये आणखी सुधारणा करण्यासाठी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली आहे, म्हणून, हा अध्यादेश प्रख्यापित करण्यात येत आहे.

मुंबई, **एस्. एम्. कृष्णा,**
दिनांक २६ फेब्रुवारी २००७. महाराष्ट्राचे राज्यपाल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. ज. मो. फाटक,**
शासनाचे प्रधान सचिव.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई